**C** प्रश्नपत्रिका संच **C**

# अकोला जिल्हा पोलीस भरती- 2024-2025

## प्रश्नपत्रिका

लेखी परिक्षा : एकुण गुण :- १००

दिनांक :- १५/०३/२०२६. वेळ :- दिड तास (९० मिनिटे)

---

## <u>उमेदवारांकरीता सुचना.</u>

(१) सदर प्रश्नपुस्तिकेत १०० प्रश्न अनिवार्य आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करुन घ्यावी.

(२) आपला चेस्ट क्रमांक ह्या चौकोनात | | | | | न विसरता बॉलपेनने लिहावा.

(३) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला ४ पर्याची उत्तरे असून त्यांना **'A'**,**'B'**,**'C'** आणि **'D'** असे क्रमांक दिलेले आहेत. यापैकी योग्य उत्तराचा क्रमांक उत्तर पत्रिकेवरील सुचने प्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा.

(४) उत्तरपत्रिकेवर उत्तर क्रमांक नमुद करतांना तो संबधित प्रश्नक्रमांका समोर छायांकित करुन दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी ह्याकरीता **फक्त काळया शाईचा बॉलपेन** वापरावा.

(५) खालील नमुन्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे निवडलेले वर्तुळ फक्त **काळया शाईच्या बॉलपेनने** संपूर्णपणे छायांकित करुन प्रत्येक प्रश्नांचे उत्तर नमूद करावे. **अयोग्य** पध्दतीने नमूद केलेल्या उत्तरास गुण दिले जाणार नाहीत.

| **योग्य** A B ● D | **अयोग्य** ⊗ ◡ -- 0 |
|---|---|

(६) उत्तरपत्रिकांची तपासणी ओ.एम.आर. (OMR) मशीनवर करण्यात येत असल्याने एकदा नमूद केलेली माहिती वा उत्तरे खोडता येणार नाहीत. उत्तरे खोडून नव्याने नमूद केल्यास अथवा त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल केल्यास त्याचे ते उत्तर ग्राह्य मानले जाणार नाही व अशा उत्तरांना शुन्य गुण देण्यात येतील.

(७) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. निगेटिव्ह मार्किंग नाही.

(८) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क ) करावे. प्रश्न पुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदपत्रावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल.

(९) उमेदवाराने आपले नाव व इतर कोणतीही ओळखीची खूण उत्तरपत्रिकेत करु नये असे आढळून आल्यास उमेदवाराला अपात्र ठरविण्यात येईल.

(१०) मोबाईल व कॅल्क्युलेटरचा वापर करु नये असे आढळल्यास अपात्र ठरविण्यात येईल.

---

## नमुना प्रश्न.

**प्रश्न क्र. ५१ :-** खालील पैकी भारताची राजधानी कोणती आहे.

**(A)** मुंबई. **(B)** कोलकाता **(C)** नवी दिल्ली **(D)** चेन्नई.

या प्रश्नाचे योग्य उत्तर **(C)** **नवी दिल्ली** असे आहे, त्यामुळे **(C)** हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करुन दाखविणे आवश्यक आहे.

**उत्तर :-** A B ● D

अशा पध्दतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररित्या पूरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील ज्या-ज्या प्रश्नक्रमांसमोरील संबंधित वर्तूळ पूर्णपणे छायांकित करुन दाखवावा. ह्याकरिता फक्त काळया शाईचे बॉलपेन वापरावे.

**Q.1: एका रकमेचे 10% वार्षिक दराने 146 दिवसांचे व्याज 350 रुपये मिळते तर ती रक्कम कोणती ?**

(A) 8750 (B) 7865

(C) 6750 (D) 5220

**Q.2:** $48 \div 6 \times (5 + 3) - 4^2 = ?$ .

(A) 32 (B) 64

(C) 56 (D) 48

**Q.3: .**

$$\sqrt{X + \sqrt{40 + \sqrt{68 + \sqrt{169}}}} = 11$$ तर X ची किमत काढा ?

(A) 104 (B) 124

(C) 114 (D) 0

**Q.4: .** $\frac{1}{174X356} + \frac{1}{356X182} - \frac{1}{174X182} = ?$

(A) . $1$ (B) . $\frac{1}{182}$

(C) . $0$ (D) . $\frac{1}{356}$

**Q.5: मोटारगाडी A 160 कि.मी. प्रति तास वेगाने धावते तर मोटारगाडी B 140 कि.मी. प्रतितास वेगाने धावते. दोन्ही गाड्या एकाच दिशेने धावतात. मोटारगाडी B ही मोटारगाडी A च्या 80 कि.मी. पुढे आहे. तर मोटारगाडी A ला मोटारगाडी B पर्यंत पोहचण्यास किती वेळ लागेल ?**

(A) 2.5 तास (B) 15 तास

(C) 1 तास (D) 4 तास

**Q.6: आठ संख्यांची सरासरी 100 आहे. त्यापैकी एकूण पाच संख्यांची बेरीज 500 आहेत. उर्वरित तीन संख्या 1:2:3 च्या प्रमाणात आहेत. तर ते तीन अंक कोणते ?**

(A) 15, 20, 25 (B) 60, 120, 180

(C) 50, 100, 150 (D) 10, 20, 30

**Q.7: 84 मीटर त्रिज्या असणाऱ्या गोलाकार मैदानाला तारेची तिहेरी कुंपण बांधण्यासाठी किती मीटर तार लागेल ?**

(A) 1584 मीटर (B) 252 मीटर

(C) 84 मीटर (D) 1762 मीटर

**Q.8: एक पाण्याची टाकी 2/3 भरलेली आहे. ती टाकी एका नळाने 30 तासात भरते तर दुसऱ्या नळाने 10 तासात (रिकामी) होते. जर दोन्ही नळ एकाच वेळी चालू केले तर ती टाकी पूर्णपणे रिकामी होण्यास किंवा भरण्यास किती तास लागतील?**

(A) 16 तास | (B) 20 तास
(C) 15 तास | (D) 10 तास

**Q.9: 300 ते 500 पर्यंत 3 हा अंक फक्त एकदाच असणाऱ्या संख्या किती?**

(A) 99 | (B) 100
(C) 108 | (D) 90

**Q.10: एका थैलीत 1 रुपयांची, 50 पैशांची व 25 पैशांच्या नाण्यांची संख्या समान असून थैलीतील एकूण ₹105 रुपये आहेत तर प्रत्येक प्रकारच्या नाण्यांची संख्या किती ?**

(A) 60 | (B) 90
(C) 50 | (D) 21

**Q.11: धन्याने कॉफी बनवण्यासाठी 10% पाणी असलेले दूध व पाण्याचे 70 लिटर मिश्रण तयार केले. परंतु ग्राहकांना कमी दूध असलेली कडक कॉफी हवी होती. 25% पाणी असलेले मिश्रण तयार करण्यासाठी या मिश्रणात घालाव्या लागणाऱ्या पाण्याची लिटरमध्ये राशी निवडा.**

(A) 15 | (B) 12
(C) 10 | (D) 14

**Q.12: पहिल्या 150 क्रमवार नैसर्गिक संख्यांच्या घनांची बेरीज किती ?**

(A) 11250 | (B) 11475
(C) 11325 | (D) 11175

**Q.13: 5, 10, 17, 26, 37, 50, ?**

(A) 42 | (B) 65
(C) 100 | (D) 84

**Q.14: .** $(a + 2b)^2 =?$

(A) . $a^2 + 4b^2 + 4ab$ | (B) . $2a^2 b^2$
(C) . $a^2 + 2b^2$ | (D) . $(ab)^2$


**Q.15: .**

शेष सिद्धांताचा उपयोग करून $X^3 + 2X^2 - 4X + 1$ या बहुपदीस $(X - 1)$ ने भागाकार करा आणि बाकी काढा ?

(A) - 2 (B) 0

(C) 2 (D) - 4

**Q.16: इमारत बांधताना विविध बाबींवरील खर्च दाखवणारा वृत्तालेख दिलेला आहे, इमारत बांधण्याचा एकूण खर्च ₹ 10,80,000 आहे, त्यावरून लोखंडासाठी झालेला खर्च किती ?**




(A) ₹ 2,70,000 (B) ₹ 90,000

(C) ₹ 1,00,000 (D) ₹ 1,35,000

**Q.17: एका व्यक्तीने सायकल ₹ 3680 ला विकत घेतली आणि ती ₹ 3496 ला विकली. तर किती टक्के तोटा होईल ?**

(A) 8 % (B) 5 %

(C) 6 % (D) 4 %

**Q.18: एका वर्तुळाचा परिघ 88 चौ. मीटर आहे. तर वर्तुळाचा व्यास किती मीटर असेल ?**

(A) 14 मीटर (B) 9 मीटर

(C) 7 मीटर (D) 28 मीटर

**Q.19: 7 पुरुष किंवा 10 महिला एक 100 मीटरची भिंत 10 दिवसात बांधतात. 1000 मीटरची भिंत बांधण्यासाठी 14 पुरुष व 20 महिला किती दिवस घेतील ?**

(A) 30 (B) 20

(C) 15 (D) 25

**Q.20: एक कंपनी एक वस्तु 70 रुपयांना बनविली. ती एका व्यापाऱ्याला 100 रुपयांना विकली. व्यापाऱ्याने ती वस्तु एका दुकानदाराला 200 रुपयांना विकली. नंतर दुकानदाराने तीच वस्तु एका ग्राहकाला 300 रुपयांना विकली. तर कंपनीला झालेला नफा किती टक्के असेल ?**

(A) 70 टक्के (B) 185.7 टक्के

(C) 42.86 टक्के (D) 328.57 टक्के

**Q.21: 15x + 17y = 22,**

**17x + 15y = 42,**

**तर (x + y) = ?**

(A) 2 (B) 1

(C) 0 (D) 3

**खालील विधानाच्या आधारे पुढील तीन प्रश्नांची उत्तरे द्या.**

**सात मित्र - A, B, C, D, E, F आणि G हे प्रत्येकजण वेगवेगळ्या शहरात प्रवास करतात आणि प्रत्येकजण वेगवेगळ्या वाहतुकीच्या साधनाचा वापर करतो.**

**शहरे - दिल्ली, मुंबई, चेन्नई, कोलकाता, जयपूर, पुणे, लखनऊ**

**वाहतूक साधने - ट्रेन, बस, कार, विमान, सायकल, मेट्रो, जहाज**

**(वरील यादी दिलेल्या क्रमाने नाही)**

**1. D चेन्नईला जातो आणि मेट्रो वापरतो**

**2. जो मुंबईला जातो तो जहाज प्रवास करतो**

**3. जो पुण्याला जातो तो ट्रेन वापरत नाही**

**4. G दिल्लीला जातो**

**5. जो बस वापरतो, तो लखनऊला जातो**

**6. C पुण्याला जातो**

**7. G ट्रेन आणि कार वापरत नाही**

**8. A जहाज वापरतो**

**9. F सायकल वापरतो**

**10. जो दिल्लीला जातो तो विमानाने प्रवास करतो**

**11. B कोलकत्ताला जातो**

**Q.22: B कोणते वाहतुकीचे साधन वापरतो?**

(A) बस (B) ट्रेन

(C) विमान (D) जहाज

**Q.23: E कोणत्या शहरात जातो?**

(A) मुंबई

(B) यापैकी नाही

(C) जयपूर

(D) लखनऊ

**Q.24: खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?**

(A) C - पुणे - मेट्रो

(B) F - जयपूर - सायकल

(C) G – दिल्ली – ट्रेन

(D) B - लखनौ - बस

**Q.25: 4913 चे घनमूळ किती ?**

(A) 18

(B) 19

(C) 16

(D) 17

**Q.26: __abbb__b__babb. (रिक्त जागी योग्य पर्याय निवडा)**

(A) abb

(B) bba

(C) bab

(D) aab

**Q.27: खालील महितीशी सुसंगत असणाऱ्या वेन आकृतीचा पर्याय ओळखा ?**
**दिलेली माहिती - भारत, छत्तीसगड, उत्तर प्रदेश**

(A) .


(B) .


(C) .


(D) .


**Q.28: B4Y, D16W, F36U, H64S, ?**

(A) J100Q

(B) J100R

(C) L81R

(D) J81Q

**Q.29: पुढील तक्त्यावरून योग्य पर्याय निवडा ?**

| | | |
|---|---|---|
| 225 | 12 | 81 |
| 169 | 10 | 49 |
| 121 | 7 | ? |

(A) 25
(B) 64
(C) 9
(D) 36

**Q.30: THROUGH : UJUSZMO :: COSTUME : ?**

(A) DOVXZSK
(B) DQVXZSL
(C) DIWXZSK
(D) DOYZXSL

**Q.31: एका सांकेतिक भाषेत Ramesh is Smart हे शब्द 765 असे लिहीले जातात तर 978 म्हणजे Smart and Beautiful, तसेच 862 म्हणजे Rose is Beautiful तर त्याभाषेत is, Beautiful करिता कोणते अंक वापरले आहेत?**

(A) 5,8
(B) 6,8
(C) 8,6
(D) 7,8

**Q.32: एका घडयाळात 03.30 वाजता तास काटा व मिनिट काटा यामधील कोन किती अंशाचा असेल?**

(A) 85 अंश
(B) 90 अंश
(C) 75 अंश
(D) 80 अंश

**Q.33: अ.रामचे गुण राणीपेक्षा जास्त आहेत.**

**ब.राणीचे गुण रत्नापेक्षा कमी आहेत.**

**क.रत्नाचे गुण रामपेक्षा जास्त आहेत.**

**ड. पद्माचे गुण रामपेक्षा जास्त आहेत.**

**इ. रत्नाचे गुण पद्मापेक्षा जास्त आहेत.**


**तर सर्वात जास्त गुण कोणाला मिळाले ?**

(A) राम
(B) रत्ना
(C) पद्मा
(D) राणी

**Q.34: 9.8, ? , 8.9, 11.6, 8, 12.5 (प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य पर्याय निवडा.)**

(A) 11.3
(B) 10.7
(C) 12.3
(D) 10.2

**Q.35: आकृतीत किती त्रिकोण आहेत ?**




(A) 22

(B) 19

(C) 20

(D) 21

**Q.36: .**




(A) 118

(B) 98

(C) 108

(D) 124

**Q.37: विसंगत घटक निवडा ?**

**जर्मनी, क्युबा, श्रीलंका, मादागास्कर, न्यूझीलँड**


(A) क्युबा

(B) जर्मनी

(C) न्यूझीलँड

(D) श्रीलंका

**Q.38: 5 च्या विरुद्ध अंक कोणता ?**




(A) 3

(B) 6

(C) 1

(D) 4

**Q.39: 1982 ते 2026 वर्षापर्यंत किती लिप वर्ष येतील ?**

(A) 13 (B) 12

(C) 11 (D) 10

**Q.40: जर दिलेल्या अक्षरांच्या शृंखलेतील विषम स्थानावरील अक्षरे काढून टाकल्यास किती स्वर उरतील ?**

**MISEPIPSOBUSDIVIL**

(A) 7 (B) 5

(C) 6 (D) 4

**Q.41: दिवसातुन किती वेळा मिनिट काटा व तास काटा एकमेकांवर येतात ?**

(A) 24 (B) 48

(C) 36 (D) 22

**Q.42: 12 मुलांचे सरासरी वय 15 वर्षे असून त्यातील 8 मुलांचे सरासरी वय 16 वर्षे आहे तर उरलेल्या मुलांचे सरासरी वय किती ?**

(A) 12 वर्षे (B) 15 वर्षे

(C) 17 वर्षे (D) 13 वर्षे

**Q.43: खालील विधानासाठी कोणते अनुमान योग्य आहे ?**

**विधान :**

**काही उमेदवार खेळाडू आहेत,**

**काही उमेदवार मेहनती आहेत.**

(A) सर्व उमेदवार मेहनती असतीलच (B) काही उमेदवार खेळाडू नाहीत

(C) सर्व उमेदवार मेहनती आहेत (D) वरीलपैकी नाही

**Q.44: राजनला एकच बहीण आहे राजनच्या भाचीच्या मामीची आई ती राजनची कोण आहे ?**

(A) सासू (B) काकू

(C) आजी (D) मामी

**Q.45: दोन भावांच्या आजच्या वयाचे गुणोत्तर 3:4 आहे, 6 वर्षानंतर त्यांचे वयाचे गुणोत्तर 4:5 होईल, तर मोठया भावाचे 5 वर्षानंतर वय किती?**

(A) 18 वर्षे (B) 29 वर्षे

(C) 24 वर्षे (D) 30 वर्षे

**Q.46: एका पिशवीत 08 लाल व 03 निळे चेंडु आहेत त्यामधुन 02 चेंडु बाहेर काढले तर दोन्ही चेंडु निळे असण्याची संभाव्यता काढा ?**

(A) 1/5 (B) 1/13
(C) 14/45 (D) 3/55

**Q.47: एके वर्षी महाराष्ट्र दिन रविवारी आहे तर त्याचवर्षी बालदिन कोणत्या दिवशी असेल ?**

(A) रविवार (B) मंगळवार
(C) शनिवार (D) सोमवार

**Q.48: एका शाळेत A,B,C,D व E असे 5 शिक्षक आहेत A व B हिन्दी व इंग्लिश शिकवतात, C व B इंग्लिश व भूगोल शिकवतात. D व A गणित व हिन्दी शिकवतात. E व B इतिहास व फ्रेंच शिकवतात तर कोणता शिक्षक सर्वाधिक विषय शिकवतो ?**

(A) A (B) C
(C) B (D) D

**Q.49: 7.5 वर्षे + 29 महिने - 2.5 वर्षे = ?**

(A) 7 वर्षे 5 महीने (B) 6.5 वर्षे
(C) 7.5 वर्षे (D) 6 वर्षे 5 महीने

**Q.50: मराठी महीण्याची सुरूवात भाद्रपदपासुन होते असे समजल्यास वर्षाचा सहावा मराठी महीना खालीलपैकी कोणता असेल ?**

(A) चैत्र (B) पौष
(C) माघ (D) वैशाख

**Q.51: खालीलपैकी नपूसकलिंगी शब्द ओळखा ?**

(A) नदी (B) भिंत
(C) वासरू (D) दगड

**Q.52: 'आईच्या कडेवर बाळ होते' या वाक्यातील कर्त्याची विभक्ती ओळखा ?**

(A) चतुर्थी (B) तृतीया
(C) षष्ठी (D) पंचमी

**Q.53: खालीलपैकी कोणता व्यंजन गट ओष्ठ्य वर्गात येतो ?**

(A) क्, ख्, ग्, घ् (B) ट्, ठ्, ढ्, ण्
(C) प्, फ्, ब्, भ् (D) त्, थ्, द्, ध्

**Q.54: योग्य जोडी लावा**

| **(संधी)** | **(प्रकार )** |
|---|---|
| **अ) मनोराज्य** | **1 ) विसर्ग 'र' संधी** |
| **ब) दुरात्मा** | **2) अनुनासिक संधी** |
| **क) जगन्नाथ** | **3 ) पूर्वरूप संधी** |
| **ड) चांगलेसे** | **4) विसर्ग उकार संधी** |

(A) .

| अ | ब | क | ड |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |

(B) .

| अ | ब | क | ड |
|---|---|---|---|
| 4 | 1 | 2 | 3 |

(C) .

| अ | ब | क | ड |
|---|---|---|---|
| 4 | 2 | 3 | 1 |

(D) .

| अ | ब | क | ड |
|---|---|---|---|
| 2 | 3 | 4 | 1 |

**Q.55: अमर पणत्या लावतो. या वाक्यातील अधोरेखित नामाचे वचन ओळखा ?**

(A) बहुवचन
(B) एकवचन
(C) अनाम वचन
(D) द्विवचन

**Q.56: पुढीलपैकी कोणता शब्द प्रत्ययसाधित नाही ?**

(A) पथिक
(B) पुकार
(C) लेखक
(D) झोपाळू

**Q.57: आवृत्तीदर्शक क्रियाविशेषण अव्यये ओळखा ?**

(A) गल्लोगल्ली, गावोगाव, घरोघर, हरघडी
(B) वारंवार, क्षणोक्षणी, दररोज, पुनःपुन्हा
(C) झटकन, पटकन, पटापट, खटाखट
(D) सभोवती, सभोवार, अलीकडे, पलीकडे

**Q.58: विशिष्ठ अक्षरांचा किवा शब्दांचा आरोह - अवरोह सुचविण्यासाठी पुढील चिन्ह वापरतात ?**

(A) संयोग चिन्ह
(B) विकल्पचिन्ह
(C) लोपचिन्ह
(D) अवग्रह चिन्ह

**Q.59: 'मला चार मैल चालवते' . या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा ?**

(A) प्रायोजक क्रियापद
(B) संयुक्त क्रियापद
(C) शक्य क्रियापद
(D) अनियमित क्रियापद

**Q.60: 'लाटणी' या अनेकवचनी नामाचे एकवचनी असणारा पर्याय निवडा ?**

(A) लाटणे (B) लाटणी

(C) लाटण्या (D) लाटण

**Q.61: विरूद्धार्थी शब्दांची अयोग्य जोडी ओळखा ?**

(A) उघड x गुप्त (B) आगंतुक x आमंत्रित

(C) अनाथ x सनाथ (D) काळजी x विवंचना

**Q.62: 'रत्नाकर' या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता ?**

(A) सूर्य (B) पर्वत

(C) समुद्र (D) चंद्र

**Q.63: 'शब्दच्छल' या संधीची फोड कशाप्रकारे होईल ?**

(A) शब्द + च्छल (B) शब्द + सल

(C) शब्द + छल (D) शब्द + चल

**Q.64: वाक्यात प्रयोग होतांना काही शब्दांच्या लिंग वचन रूपात बदल होतो. त्या बदलास ________ म्हणतात ?**

(A) प्रकृती (B) परिवर्तन

(C) विकार (D) प्रत्यय

**Q.65: 'आम्ही जातो आमुच्या गावा' हे वाक्य कोणत्या प्रकारात मोडते ?**

(A) संयुक्तवाक्य (B) केवलवाक्य

(C) प्रधानवाक्य (D) मिश्रवाक्य

**Q.66: 'राजाला दिवाळी काय माहीत' ही म्हण कोणत्या अर्थाने वापरली जाते ?**

(A) राजाला दिवाळी रोजचीच असते (B) राजाला कायम प्राणहीतची काळजी करावी लागते

(C) रोजच्या गोष्टीचे नावीन्य वाटत नाही (D) युद्ध आणि संघर्ष हेच राजाचे जीवन असते

**Q.67: 'जन्मखोड' हा सामासिक शब्द कोणत्या समासाचे उदाहरण आहे ?**

(A) षष्ठी तत्पुरष (B) तृतीया तत्पुरष

(C) चतुर्थी तत्पुरष (D) पंचमी तत्पुरष

**Q.68: खालीलपैकी कोणते भाववाचक नाम नाही ?**

(A) नवलाई (B) शांत

(C) समता (D) धैर्य

**Q.69: 'महात्मा गांधी सत्याग्रह करू लागले' या वाक्यातील विधेय ओळखा ?**

(A) सत्याग्रह
(B) गांधी
(C) महात्मा
(D) करू लागले

**Q.70: 'बाबाने मुलीला शाळेत पाठवले' . प्रयोग ओळखा ?**

(A) कर्म कर्तरी प्रयोग
(B) कर्म - भाव संकर प्रयोग
(C) कर्तृ - भाव संकर प्रयोग
(D) कर्तृ - कर्म संकर प्रयोग

**Q.71: 'देवा, सर्वांना सुखी ठेव'. या वाक्यातील क्रियापदाचा अर्थ ओळखा ?**

(A) आज्ञार्थ
(B) विध्यर्थ
(C) संकेतार्थ
(D) स्वार्थ

**Q.72: खालील चिन्हापैकी अपूर्ण विराम ओळखा ?**

(A) ?
(B) !
(C) ;
(D) :

**Q.73: खालीलपैकी विसंगत जोडी कोणती ?**

(A) 75 वर्षे - हीरक महोत्सव
(B) 100 वर्षे - शताब्दी महोत्सव
(C) 50 वर्षे - सुवर्ण महोत्सव
(D) 25 वर्षे - रौप्य महोत्सव

**Q.74: शुद्ध शब्द ओळखा ?**

(A) स्वभावीक
(B) शीक्षण
(C) सुगरण
(D) क्षत्रीय

**Q.75: 'मनात मांडे खाणे' या वाक् प्रचाराचा खालीलपैकी योग्य अर्थ कोणता ?**

(A) मानसिक भूक भागवणे
(B) मनोरथ रचणे
(C) एखादी गोष्ट गुप्त ठेवणे
(D) कल्पनेतच सुख मिळविणे

**Q.76: नुकताच भारतीय दंड संहिता (IPC) रद्द करून त्या एवजी कोणता नवीन कायदा लागू करण्यात आला आहे ?**

(A) भारतीय न्याय संहिता (BNS)
(B) यापैकी कोणताही नाही.
(C) भारतीय साक्ष अधिनियम (BSA)
(D) भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNSS)

**Q.77: __________ हा दिवस संविधान दिवस म्हणून भारतात साजरा केला जातो ?**

(A) 14 नोव्हेंबर
(B) 26 नोव्हेंबर
(C) 26 जानेवारी
(D) 2 ऑक्टोबर

**Q.78: RAW संस्थेचे पूर्ण रूप (Full Form) खालीलपैकी कोणते आहे ?**

(A) रिजनल अनालिसिस विंग
(B) रिसर्च अँड असेसमेंट विंग
(C) रिसर्च अँड अनालिसिस विंग
(D) रिसर्च अँड ॲडमिनिस्ट्रेशन विंग

**Q.79: शिवाजी महाराजांच्या अष्ठप्रधान मंडळापैकी कोणते पद परराष्ट्र मंत्री म्हणून काम बघायचे ?**

(A) पंत अमात्य
(B) पंत सचिव
(C) पंत सुमंत
(D) मंत्री (वाकनीस)

**Q.80: कोणाला 'अणुबॉम्ब चे जनक' मानले जाते ?**

(A) अल्फ्रेड नोबेल
(B) होमी जहांगीर भाभा
(C) आयझॅक न्यूटन
(D) जे. रॉबर्ट ओपेनहायमर

**Q.81: अकोला पोलीस दलाच्या कोणत्या प्रकल्पाची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे ?**

(A) प्रोजेक्ट TRINETRA
(B) प्रोजेक्ट MARVEL
(C) प्रोजेक्ट MUSKAN
(D) प्रोजेक्ट SAHYOG

**Q.82: अकोला जिल्ह्यात सध्या सर्वाधिक क्षेत्रावर कोणत्या पिकाची लागवड केली जाते ?**

(A) कापूस
(B) सोयाबीन
(C) तूर
(D) ज्वारी

**Q.83: UPI याचा वाणिज्यमध्ये काय अर्थ आहे ?**

(A) United Payment Interface
(B) Unified Payments Infrastructure
(C) Universal Payments Integration
(D) Unified Payments Interface

**Q.84: मुंबई उच्च न्यायालयाचे खालीलपैकी कोणत्या शहरात खंडपीठ नाही ?**

(A) कोल्हापूर
(B) पुणे
(C) पणजी
(D) नागपूर

**Q.85: पोलीस पाटलांची नेमणूक कोणता विभाग करतो ?**

(A) जिल्हा परिषद
(B) ग्राम विकास विभाग
(C) महसूल विभाग
(D) पोलीस विभाग

**Q.86: 'राष्ट्रीय आरोग्य मेळावा 2026' खालीलपैकी कोणत्या जिल्ह्यात झाला ?**

(A) अकोला
(B) बुलढाणा
(C) वाशिम
(D) यवतमाळ

**Q.87: खालील दिलेल्या महाराष्ट्रातील प्रमुख नद्यांना त्यांच्या भौगोलिक स्थानानुसार 'उत्तर ते दक्षिण' अशा क्रमाने लावा ?**

**1. गोदावरी 2. तापी 3. कृष्णा 4. भीमा**

(A) 1-4-2-3 (B) 2-1-4-3
(C) 2-4-1-3 (D) 1-2-4-3

**Q.88: 'नरनाळा किल्ला' अकोला जिल्ह्यातील कोणत्या तालुक्यामध्ये येतो ?**

(A) बाळापुर (B) मूर्तीजापुर
(C) अकोट (D) तेल्हारा

**Q.89: महाराष्ट्रातील खालीलपैकी कोणते प्रसिद्ध ऐतिहासिक स्थळ UNESCO जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट नाही ?**

(A) गेट वे ऑफ इंडिया (B) एलिफंटा लेणी
(C) अजिंठा लेणी (D) छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT)

**Q.90: नुकताच 'स्टारलिंक' सोबत महाराष्ट्राचा करार झाला. स्टारलिंक कंपनी खालीलपैकी कशासंबंधी आहे ?**

(A) स्पेस टेलिस्कोप (B) AI / रोबोटिक्स
(C) सेमी कंडक्टर चिप (D) इंटरनेट आणि टेलि - कम्युनिकेशन

**Q.91: खालीलपैकी कोणत्या ठिकाणी पोलीस आयुक्तालय नाही ?**

(A) सोलापूर (B) नाशिक
(C) अमरावती (D) कोल्हापूर

**Q.92: घरगुती वापरात असलेल्या LPG चे पूर्ण रूप (Full form) काय आहे ?**

(A) Liquified Power Gas (B) Liquid Propane Gas
(C) Liquified Petroleum Gas (D) Light Petroleum Gas

**Q.93: 'ऑस्ट्रेलियन ओपेन 2026' टेनिस स्पर्धेमध्ये महिला विजेत्या कोण आहेत ?**

(A) एलिना रायबाकिना (B) सेरेना विलियम्स
(C) जेसीका पेगुला (D) आर्यना सबालेंका

**Q.94: मानवी रक्तातील ऑक्सीजन वहन करण्याचे मुख्य कार्य कोणत्या घटकाद्वारे केले जाते ?**

(A) प्लेटलेट्स (B) प्लाजमा
(C) हिमोग्लोबिन (D) पांढऱ्या रक्तपेशी

**Q.95: अरवली, हिमालय, आलप्स, रॉकी हे खालील पैकी कोणत्या प्रकरचे पर्वत आहेत ?**

(A) अवशिष्ट
(B) गरीया
(C) वलीय
(D) ज्वालामुखी

**Q.96: अकोला जिल्ह्याची सीमा खालीलपैकी कोणत्या जिल्ह्याला लागत नाही ?**

(A) यवतमाळ
(B) वाशिम
(C) बुलढाणा
(D) अमरावती

**Q.97: बेकायदेशीर अटक व स्थानबध्दता यापासून संरक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयाकडे कोणत्या घटनात्मक तरतुदीनुसार दाद मागता येते ?**

(A) हॅबिअस कार्पस
(B) स्थगनादेश
(C) मॅंडमस
(D) को वारंटो

**Q.98: कैलास मंदिराची (एलोरा) निर्मिती कोणत्या राजवटीत झाली ?**

(A) चालुक्य
(B) मौर्य
(C) सातवाहन
(D) राष्ट्रकूट

**Q.99: रेपोरेट म्हणजे ज्या व्याजदराने _______**

(A) RBI व्यापारी बँकांना कर्ज देते
(B) RBI व्यापारी बँकांकडून कर्ज घेते
(C) RBI भांडवली बाजाराला कर्ज देते
(D) RBI भांडवली बाजाराला कर्ज घेते

**Q.100: भारताची प्रमाण वेळ ग्रीनव्हीच येथील वेळेपेक्षा _______ इतक्या वेळाने पुढे आहे ?**

(A) 6 तास 15 मीनिट
(B) 4 तास 30 मीनिट
(C) 5 तास 30 मीनिट
(D) 5 तास